SANJSAMACHAR

Date: 16 February, 2010

Edition: Pune

Page No.: 4

# 'यूएफओ मूव्हीज' तर्फे 'डीएलएफ आयपीएल २०१०' सामन्यांचे भारतभरातील चित्रपटगृहांमध्ये थेट प्रसारण दाखवले जाणार

पुणे, जगातील सर्वांत मोठे डिजिटल सॅटेलाईट सिनेमा नेटवर्क असलेल्या 'यूएफओ मूव्हीज' तर्फे क्रिकेट सामने पाहण्याचा आनंद लुटण्यासाठी प्रेक्षकांना एक नवे व्यासपीठ उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

क्रिकेटचा मनोरंजनात्मक अनुभव अधिक वृद्धिंगत करण्यासाठी 'यूएफओ मूव्हीज' येत्या १२ मार्चपासून सुरु होणाऱ्या डीएलएफ आयपीएल २०१० सामन्यांचे भारतभर मल्टीप्लेक्स, तसेच एकच पडदा असलेल्या चित्रपटगृहांत हाय डेफिनिशन डिजिटल फॉरमॅटमध्ये कोणत्याही जाहिरातींखेरीज प्रसारण दाखवणार आहे. प्रेक्षकांना अगदी क्रीडांगणावर सामना बघण्याचा अनोखा अनुभव मिळवून दिला जाणार आहे. अनिव रंजन मूल्य देण्यासाठी आणि आयपीएल सामन्यांची जादू टिकवून ठेवण्यासाठी चित्रपटगृहांमध्ये खास महोत्सव भरवून क्रिकेट स्टेडियमसारखे वातावरण निर्माण केले जाई. चित्रपटगृहांत संपूर्ण कुटुंबाच्या आवडीची क्रिकेटशी संबंधित विक्रि उत्पादने, आकर्षक भेटवस्तू, वैविध्यपूर्ण खाद्यपदार्थांचे स्टाल्स असतील. या उपक्रमात अधिक रंग भरण्यासाठी अनेक चित्रपटगृहांत चीअर लीडर्स व वाद्यवृंदही सज्ज असतील.

स्पर्धेच्या काळात आयोजित केलेल्या विविध संवादात्मक उपक्रमांचे सूत्रसंचालन एक सिनेमा जॉकी करणार आहे. वेळोवेळी घेतलेल्या स्पर्धांमधील विजेत्यांची नावे देशभर विविध चित्रपटगृहांत पडद्यावर झळकतील. विविध क्षेत्रांतील नामवंत नियमितपणे या चित्रपटगृहांमध्ये भेट देऊन संघांना प्रोत्साहित करतील. हा महोत्सव तब्बल ४५ दिवस चालणार आहे. बहुतेक प्रेक्षक क्रिकेटचे सामने आपला मित्र परिवार व कुटुंबीय यांच्यासमवेत पाहाणे पसंत करतात.

अशांना सामन्यांचे थेट प्रसारण सर्वोत्कृष्ट वातावरणात तेही कोणत्याही जाहिरातीचा अडथळा न येता अनुभवता येणार आहे.